CIDCO
WE MAKE CITIES

दिनांक : - २२/१२/२०२१

# सिडको महागृहनिर्माण योजना-२०१९,स्वप्नपूर्ती गृहनिर्माण योजना, वास्तुविहार उन्नती गृहनिर्माण योजना व पोलिस सोडत -२०२० या योजनेच्या अपिल प्रक्रियेतून पुढील प्रक्रियेकरीता शिफारस केलेल्या व अपात्र अर्जदारांची यादी जाहिर

उपरोक्त योजनेमधील कागदपत्रे पडताळणीमध्ये अपात्र ठरलेल्या अर्जदारांच्या अपिलाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, अर्जदारांनी स्वत:च्या लॉगीनमध्ये जाऊन "माय ॲप्लिकेशन" वर क्लिक करुन पुढील प्रक्रियेकरिता शिफारस केलेल्या अथवा अपात्र असल्याचे पाहता येणार आहे. ज्या अर्जदारांना त्यांच्या लॉगिन मध्ये पुढील प्रक्रियेकरीता शिफारस (Recommended for Next Process) असे दिसून येते त्यांना लवकरच वाटपपत्र (Allotment Letter) देण्यात येतील.

ज्या अर्जदारांचे अर्ज "पुढील प्रक्रियेकरीता शिफारस/ Recommended for Next Process" करण्यात आले आहेत, त्यांच्या कागदपत्रांमध्ये भविष्यात काही त्रुटी आढळल्यास कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार महाव्यवस्थापक (गृहनिर्माण) यांना असून सदरहू अर्जावर नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) अधिनियम २००९ अन्वये कार्यवाही करून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा अर्जदारांच्या सदनिकेचे वितरण रद्द करण्यात येईल.

ज्या अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करताना तफावत आढळून आली आहे अथवा ज्या अर्जदारांनी कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही अशा अपात्र अर्जदारांना त्यांच्या अनामत रक्कमेचा परतावा लवकरच करण्यात येईल.

अर्जदारांना स्वत:च्या लॉगीनमध्ये जाऊन "माय ॲप्लिकेशन" वर क्लिक करुन आपला निकाल पाहता येणार आहे.

१) अर्जदाराने cidco.nivarakendra.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

२) स्वतःचे यूजर नेम (ॲप्लिकेशन नंबर) व पासवॉर्ड टाकून लॉगिन करावे.

३) नंतर My Application मध्ये जाऊन आपला निकाल बघावा.